# जाहीर लिलाव नोटीस

मध्यवर्ती संशोधन केंद्र, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला अंतर्गत सामान्य विभागाच्या परिसरातील एकुण 14 आवळा फडझाडांचा चालू फळ बहराचा जाहीर लिलाव करण्याचे ठरविण्यात आलेले असून सदर जाहीर लिलाव **दिनांक : 26.08.2025** सकाळी **10:30 वाजता** सामान्य विभागाचे प्रांगणात करण्यात येणार आहे.

तरी सर्व इच्छुक व्यापाऱ्यांनी सामान्य विभाग येथे वरील वेळेत बोली बोलण्याकरिता उपस्थित राहावे. लिलावाचे नियम व अटी या कार्यालयामध्ये कार्यालयीन वेळेत पहावयास मिळतील.

संचालक
मध्यवर्ती संशोधन केंद्र
डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला

# जाहीर लिलावाच्या अटी

सामान्य विभागाच्या परिसरातील आवळा चालू फळ बहाराच्या जाहीर लिलाव दिनांक 26.08.2025 रोजी सकाळी ठीक 10:30 वाजता सामान्य विभागावर करण्यात येणार आहे. त्या लिलावाच्या अटी खालील प्रमाणे आहेत.

- सामान्य विभागावरील . आवळा च्या फक्त फळ बहराचा जाहीर लिलावात समावेश आहे.
- ज्यांना लिलावामध्ये भाग घ्यावयाचा असेल त्यांना रुपये 1000 नगदी अनामत रक्कम म्हणून नगदी भरावे लागतील.
- ज्या व्यक्तींनी रुपये 1000 अमानत रक्कम भरली असेल त्यांना फक्त लिलावाच्या वेळी प्रक्षेत्रावरील ठिकाणी हजर राहता येईल. इतर कोणत्याही व्यक्तीस लिलावाच्या वेळी स्थळी थांबता येणार नाही. विभागावरील लिलाव समितीचे सदस्य व कार्यालयीन कर्मचारी लिलावाच्या ठिकाणी राहतील.
- फळ बहराची अपेक्षित किमंत आल्याशिवाय लिलावाच्या बोली मान्य करणे अथवा नाकारणे हे लिलाव समितीच्या निर्णयावर अवलंबून राहील.
- बोली बोलणाऱ्या पैकी ज्या व्यक्तीची जास्तीत जास्त बोली असेल, त्याला लिलाव समिती मान्यता देईल व याबाबतचा अंतिम निर्णय मा. संचालक, मध्यवर्ती संशोधन केंद्र डॉ. पं. दे. कृ. वि., अकोला यांची अंतिम मंजुरी मिळाल्यानंतर हि बोली मान्य अथवा अमान्य असल्याचे संबधित व्यापारी/ ठेकेदार यांना सूचित करण्यात येईल.
- लिलावास अंतिम मंजुरी मिळाल्यानंतर त्या खरेदीदारास त्या बाबतची सूचना मिळाल्यानंतर लिलावाची 100 % रक्कम त्वरीत भरावी लागेल..
- ठरलेल्या दिवशी ठरलेल्या ठिकाणी व ठरलेल्या वेळेवर बोली बोलणारे हजर नसल्यास लिलाव रद्द करण्यात येईल तसेच तीन पेक्षा कमी बोली बोलणारे हजर असल्यास लिलाव रद्द करण्याचा अधिकार लिलाव समितीस राहील.
- झाडावरील फळे तोडताना झाडांना हानी पोहोचणार नाही याची दक्षता ठेकेदारास घ्यावी लागेल. बागेतील झाडाचे कोणत्याही प्रकारचे नुकसान झाल्यास त्याची नुकसान भरपाई ठेकेदाराकडून करण्यात येईल व ह्या बाबतचा अंतिम निर्णय संचालक , मध्यवर्ती संशोधन केंद्र, डॉ. पं. दे. कृ. वि. अकोला यांचे कडे राहील.
- फळे तोडून नेण्याची अंतिम तारीख ..................................राहील.
- ठेकेदारास विभागावरील फळ बागेतील रखवाली करिता ठेवणाऱ्या व्यक्तीची माहिती प्रभारी अधिकारी सामान्य विभाग यांना द्यावी लागेल; व त्यांचेकडून त्यांना गेटपास देण्यात येईल. प्रक्षेत्रावर फक्त गेटपास धारकांना प्रवेश राहील.
- झाडांची रखवाली ठेकेदारास स्वतः करावी लागेल राखणदारी करतेवेळी विद्यापीठातील मालमत्तेचे नुकसान होणार नाही, याची दक्षता घ्यावी, तसेच नुकसान झाल्यास लिलावाची रक्कम जप्त करून झालेली नुकसान भरपाई ठेकेदाराकडून वसूल करण्यात येईल.

संचालक
मध्यवर्ती संशोधन केंद्र
डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला